तपासणी नाक्याचे बळकटीकरण व तात्पुरत्या/कायमस्वरूपी चेकनाक्याचे अतिरिक्त कार्यक्रमासाठी योजनेसाठीचा सन २०१५-१६ साठी अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः टिआरएस-०६/२०१५/प्र.क्र.९५/फ-६
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
तारीख: २७ जानेवारी, २०१६

वाचा :-

१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर, यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.४५/२०१५-१६)/३४७ दिनांक ३.६.२०१५
२) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक :- अर्थसं-२०१४/प्र.क्र.६६/अर्थ-३, दिनांक १७.४.२०१५
३) शासन महसूल व वन विभाग क्रमांक : टिआरएस-०६/२०१५/प्र.क्र.९५/फ-६ दिनांक २७.७.२०१५
४) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. पूरक-२०१५/प्र.क्र.२०१/अर्थ-३, दिनांक १.१.२०१६
शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३ दिनांक १२.१.२०१६

शासन निर्णय :-

'तपासणी नाक्याचे बळकटीकरण व तात्पुरत्या/कायमस्वरूपी चेकनाक्याचे अतिरिक्त कार्यक्रमासाठी योजना' या योजनेचा रु. ६६.०० लक्ष एवढया रकमेचा सन २०१५-२०१६ चा प्रस्ताव प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सादर केला होता. या रकमेमधून वन विभागातील तपासणी नाक्याचे बांधकामासाठीचा खर्च करण्यात येतो. या योजनेअंतर्गत सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षासाठी रु.४६.२० लक्षची तरतुद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक २ येथील दिनांक १७.४.२०१५ च्या परिपत्रकानुसार अर्थसंकल्पित रक्कम रु.४६.२० लक्ष रकमेच्या ७०% च्या मर्यादेत रु.३२.२२ लक्ष इतका निधी वितरित व खर्च करण्यास उपरोक्त संदर्भ क्र. ३ नुसार मान्यता देण्यात आली आहे.

आता वित्त विभागाचे संदर्भ क्रमांक ३ येथील, दिनांक १.१.२०१६ रोजीच्या परिपत्रकानुसार सन २०१५ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये मंजूर झालेल्या पूरक मागण्यांचे ५०% मर्यादेत निधीचे वितरण करण्याचे अधिकार संबंधित प्रशासकीय विभागांना प्रदान केले आहेत. तसेच संदर्भ क्र.५ येथील दिनांक १२.१.२०१६ रोजीच्या परिपत्रकानुसार, दिनांक १.१.२०१६ च्या परिपत्रकान्वये प्रदान केलेल्या अधिकारा व्यतिरिक्त ०२ मजूरी या उद्दिष्टातंर्गत आता १००% निधी वितरणास उपलब्ध करुन दिला आहे.

त्यानुषंगाने एकूण उपलब्ध रु.५०.३० लक्ष मधून वजा वितरित केलेली रक्कम रु.३२.३४ लक्ष म्हणजे उर्वरीत रु.१८.०८ लक्ष इतका निधी मंजूर करुन अर्थसंकल्पीत वितरण प्रणालीद्वारे (BDS) वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

सदर योजनेवर होणारा खर्च प्रधानशीर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०१ वनीकरण १०१ (११) वनसंधारण व विकास, (११) (२७) कायमस्वरुपी २१९ चेकनाक्याचे बळकटीकरण व तात्पुरत्या/कायम स्वरुपी ४३१ चेकनाक्याची अतिरिक्त कार्यक्रमासाठी योजना (राज्य) (२४०६-२१४१) या लेखा शीर्षाखाली उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दिनांक १२.१.२०१६ च्या परिपत्रकान्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२८११३३१७८८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash Kashinath Mahajan

Digitally signed by Prakash Kashinath Mahajan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prakash Kashinath Mahajan
Date: 2016.01.28 11:34:01 +05'30'

(प्रकाश महाजन)
सहसचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४) सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
५) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई
६) महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
७) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर
८) महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर
९) जिल्हा कोषागार अधिकारी- अमरावती, गडचिरोली, नागपूर, चंद्रपूर, औरंगाबाद, पुणे, कोल्हापूर, नाशिक, ठाणे, यवतमाळ.
१०) कार्यासन अधिकारी, ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
यांना विनंती करण्यात येते की, नमूद शासन निर्णयानुसार रक्कम वितरित करण्यात यावी.
११) कार्यासन अधिकारी फ-२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) फ-६, कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.